शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे नियतकालिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१०५)

वर्ष अकरावे : अंक तिसावा । एप्रिल-मे-जून २०२२

महाराष्ट्र शासन आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार प्राप्त
श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस, कोल्हापूर संचलित

## न्यू कॉलेज, कोल्हापूर

Reaccredited By NAAC Grade 'A+'

# १९९० नंतरची मराठी कादंबरी



शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal) ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष अकरावे : अंक तिसावा**

**एप्रिल–मे–जून २०२२**

## १९९० नंतरची मराठी कादंबरी

**• संपादक •**

नंदकुमार मोरे

**• संपादक मंडळ •**

एकनाथ पाटील । शामसुंदर मिरजकर । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

**• अतिथी संपादक •**

**डॉ. व्ही. एम. पाटील**

प्राचार्य, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**गुंडोपंत पाटील**

मराठी विभाग प्रमुख, न्यू कॉलेज, कोल्हापूर

**• अतिथी संपादक मंडळ •**

अरुण शिंदे । दीपककुमार वळवी । सुजय पाटील । गोमटेश्वर पाटील । मांतेश हिरेमठ

**• प्रकाशक •**

**प्रकाश दुकळे**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

द्वारा : 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी,

फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर–४१६०१०

**• मुद्रक •**

भारती मुद्रणालय

८३२, ई वॉर्ड, शाहूपुरी ४थी गल्ली, कोल्हापूर. फोन नं.: ०२३१–२६५४३२९

**मूल्य : ३००/-**

ही संशोधन पत्रिका प्रकाशक डॉ. प्रकाश दुकळे, यांनी शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर यासाठी भारती मुद्रणालय, कोल्हापूर येथे छापून 'शब्दगंध', प्लॉट नं. ३/ब, नृसिंह कॉलनी, फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर–४१६०१० येथे प्रकाशित केली. या पत्रिकेत प्रकट झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक व मुद्रक सहमत असतीलच असे नाही.

Scanned with CamScanner

३४. 'स्त्री' स्वातंत्र्याची अभिव्यक्ती करणारी सानियांची कादंबरी डॉ. स्वप्निल बुचडे .............. १८४
३५. नव्वदोत्तर कादंबरीतील ग्रामसंवेदनांच्या पडझडीचे प्रतिबिंब प्रा. संतोषकुमार डफळापूरकर .... १८८
३६. नव्वदोत्तर स्त्रीवादी कादंबरी स्त्री जाणिवा प्रा. संगिता वामन सूर्यवंशी....... १९२
३७. १९९० नंतरच्या मराठी ग्रामीण कादंबरीवरील जागतिकीकरणाचा प्रभाव प्रा. रेखा काशिनाथ पसाले ...... १९६
३८. ग्रामीण कादंबरीकार : अनुराधा गुरव प्रा. स्मिता कोंडीबा कालभूषण .. २००
३९. १९९० नंतरच्या स्त्री कादंबरीतील जाणिवा प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे ..... २०४
४०. 'अस्वस्थ नायक' व'श्राद्ध' कादंबरीतील भाषा शैलीचा तौलनिक अभ्यास' प्रा.सुजाता संजय चोपडे (इनामदार) २०८
४१. नव्वदोत्तरी कादंबरीचा आशय आणि स्वरुप प्रा.डॉ.विजय अर्जुन रेवजे ........ २१२
४२. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी प्रा. जयवंत शं. सुतार ............ २१५
४३. १९९० नंतरची भटक्या-विमुक्तांची कादंबरी सौ. विजयालक्ष्मी विजयदेवगोजी .. २२१
४४. एकोणीशे नवोदत्तरी मराठी कादंबरीची दशा आणि दिशा प्रा. डॉ. बाबासाहेब पिरगोंडा नाईक २२६
४५. 'नव्वदोत्तर मराठी कांदबरीतील समाजचित्रण' डॉ. महावीर विठ्ठल कांबळे ...... २२८
४६. १९९० नंतरची महानगरीय कादंबरी डॉ. मनीषा आझाद नायकवडी ... २३३
४७. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कादंबरी लिंगप्पा गुळाळे.................. २३८
४८. नव्वदोत्तरी आदिवासी कादंबरीतील निसर्ग जाणिवा प्रा. रघुनाथ चंदर गवळी ......... २४२
४९. १९९० नंतरच्या स्त्रीलिखित मराठी कादंबरीमधील स्त्री जाणिवा डॉ. राजश्री बंडोपंत पोवार ......... २४७
५०. नव्वदोत्तरी कालखंड आणि रंगनाथपठारे यांच्या कादंबऱ्यांतील अनुभवविश्व प्रा. डॉ. प्रदीप पाटील ........... २५२
५१. जागतिकीकरण आणि १९९० नंतरची मराठी कांदबरी प्रा. गणपत हनुमंत निमसे ........ २५८
५२. १९९० नंतरचे स्त्रियांचे कादंबरीलेखन प्रा. डॉ. एकनाथ शामराव पाटील २६२
५३. १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील बेकारीचे चित्रण अमोल सुभाष कवडे ............ २६७
५४. नव्वदोत्तर मराठी कादंबरी : ग्राम आणि आदिवासी जीवन अमोल चांदेकर.................. २७१
५५. १९९० नंतरच्या मराठी व हिंदी कादंबऱ्यांचा तौलनिक अभ्यास डॉ. भरत भीमराव जाधव ........ २७६
५६. 'नव्वदोत्तर आदिवासी कादंबरीतील स्त्रीजीवन' डॉ. भीमराव खं. वानोळे ........ २८२
५७. १९९० नंतरची दलित कादंबरी डॉ.चंद्रकांत शंकर कांबळे ........ २८७
५८. '१९९० नंतरची आदिवासी कादंबरीकारांची मराठी कादंबरी' प्रा. दत्तू मेंगाळ .................. २९२
५९. १९९० नंतरची मराठी कादंबरी-विविधतापूर्ण विपुल प्रवाहित्व डॉ. युवराज देवाळे .............. २९९
६०. जागतिकीकरणानंतरची कृषी जीवनाचा वेध घेणारी कादंबरी प्रा. मोहन चव्हाण ............... ३०३
६१. १९९० नंतरच्या कादंबऱ्यांचे वाङ्मयीन आणि भाषिक विशेष डॉ. प्रकाश दुकळे ............... ३०९
६२. हिंदी उपन्यास साहित्य में प्रतिबिंबित बदलते मूल्य प्रा.डॉ.सौ.एस.के.पाटील ......... ३१४
६३. Post-1990 Marathi Novel and the Language Change Prof.Kirti Suhas Kurane ३१८
६४. Reflection of 'Educational Qualification' in Post 1990's Novels Prof. Anita Powar ..... ३२१
६५. Contribution of Women Novelists In writing Marathi Novels After 1990s Mrs. Daya Prasad Patil. ३२५



Scanned with CamScanner

# १९९० नंतरच्या मराठी कादंबरीतील बेकारीचे चित्रण

(बारोमास आणि अस्वस्थ नायक)

**अमोल सुभाष कवडे**

किसन वीर महाविद्यालय वाई, जि.सातारा

**प्रस्तावना:**

बाबा पद्मनजी यांच्या 'यमुना पर्यटन' पासून सुरु झालेला मराठी कादंबरीचा प्रवास आणि तिच्या विकासाचे टप्पे पाहत असताना, तत्कालीन समाजातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, परिस्थितीचा परिणाम त्या त्या कालखंडातील कादंबरीवर झालेला दिसून येतो. स्वातंत्र्यानंतर तमाम भारतीयांच्या अपेक्षा उंचावल्या त्याप्रमाणे मराठी साहित्याकडून लोकांच्या अपेक्षा वाढणे साहजिक होते. साहित्य हे भूतकाळातील घटनांचा बोधघेत वर्तमान जीवनावर भाष्य करत भविष्यकाळाचा वेध घेते त्याप्रमाणे मराठी कादंबरी नेहमीच त्या बाबतीत अग्रेसर राहिली आहे आणि वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करत आली आहे. १९९० नंतर मात्र जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण यामुळे सर्वच क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल झाले आणि त्याचा परिणाम मराठी साहित्य आणि मराठी कादंबरी यावर देखील झाला. यांत्रिकीकरणाचा वाढता प्रभाव, शिक्षण क्षेत्रातील क्रांती यामुळे माणसाचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलला, सर्वसामान्य लोकांच्या अपेक्षा उंचावल्या आणि माणूस शर्यतीच्या घोड्याप्रमाणे धावायला लागला, परंतु सर्वच घोडे जिंकत नसतात हे मात्र तो विसरला. सर्वच क्षेत्रात मोठी स्पर्धा सुरु झाली आणि माणसाच्या जीवनात यश-अपयश-नैराश्य- नकारात्मकता यांची सुरवात झाली. मागणी आणि पुरवठा हा सिद्धांत सत्ताधारी लोकांनी अंमलात आणला नाही, खाजगी शिक्षण संस्थाचा बाजार जोमाने सुरू झाला, डोनेशन संस्कृती उदयाला आली आणि त्यातून बेकारीचे उत्पादन बाहेर येऊ लागले. या सर्व घटकांचा परिणाम मराठी कादंबरीवर पडला आणि समकालीन वास्तव परिस्थितीचा वेध लेखकांनी साहित्याच्या माध्यमातून घेण्यास सुरवात केली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये सदानंद देशमुख यांची साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरी बारोमास ( २००२) आणि उत्तम कांबळे यांची अस्वस्थ नायक (२०००) या दोन कादंबऱ्यातील बेकारीचे चित्रण याविषयी आढावा घेण्यात आला असून प्रस्तुत शोधनिबंध हा वरील दोन कादंबऱ्यापुरता मर्यादित आहे.

**बेकरीतून उद्ध्वस्त झालेले कुटुंब – बारोमास**

३५० पृष्ठांची असणारी ही कादंबरी एकूण २४ प्रकरणामध्ये विभागली आहे. बारोमास ही कादंबरी ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी असली तरी कादंबरीचे आशयसूत्र हे बेकारी आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या या भोवतीच फिरताना दिसते. कादंबरीचे कथानक थोडक्यात पुढीलप्रमाणे

अत्यंत गरीब आणि हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगणारे सुभानराव यांनी आपला मुलगा म्हणजे कादंबरीचा नायक एकनाथ याला एम.ए.बी.एड पर्यंत शिकवले आहे आणि तो प्राध्यापक होण्याचे स्वप्न ते पाहतात. परतु भ्रष्ट असणाऱ्या व्यवस्थेपुढे एकनाथ हतबल होऊन जातो, नोकरी मिळवण्यासाठी डोनेशन म्हणून देण्यासाठी लाखभर रुपये एकनाथकडे नसतात आणि वडिलांचा जमीन विकण्यास विरोध असतो. अशा परिस्थितीत बी. एस्सी असणाऱ्या श्रीमत घरातील मुलीसोबत



Scanned with CamScanner

त्याचे लग्न होते आणि त्यानंतर दुहेरी संघर्षाला सुरवात होते, संसारिक जीवनामध्ये छोट्या छोट्या गोष्टीवरून खटके उडू लागतात. डोनेशन अभावी नोकरी न मिळालेला एकनाथ शेतीत विविध प्रयोग करू पाहतो पण निसर्ग आणि भांडवलाचा अभाव यामुळे कष्ट करण्याची तयारी असूनही यशस्वी होऊ शकत नाही. त्याचबरोबर एकनाथचा लहान भाऊ तो देखील शिक्षित आहे. तलाठी होण्यासाठी तो शेतगहाण ठेवून दोन लाख व्याजाने घेतो परंतु त्यामध्ये त्याची फसवणूक होते आणि नोकरी मिळत नाही.

प्रस्तुत कादंबरीत एकाच कुटुंबातील दोन सुशिक्षित बेकार तरुणांची व्यथा सदानंद देशमुख यांनी वास्तव परिस्थितीला धरून केली आहे. सर्वसामान्य कुटुंबाच्या आपल्या मुलाकडून जेमतेम अपेक्षा असतात परंतु त्या देखील त्यांना पूर्ण करता येत नाहीत. एकनाथने शिक्षण आणि नोकरीच्या आधारावर अनेक स्वप्ने पाहिलेली असतात. एम.ए.बी.एड्. झाल्यावर वाटत होतं आपण गाव सोडू, कुठंतरी चांगल्या गावात प्राध्यापक होऊ, पगाराच्या पैशावर घर बांधू, शेती सुधारू, विकास करून घेऊ पण एवढं शिकूनही आपला विकास नाही तर मग आपण शिकलो कशाला? झक मारायला? (बारोमास पृ. ५७) यासारख्या प्रश्नांनी तो घायाळ होऊन जातो. आपल्या आईला फाटलेले लुगडे शिवताना पाहून त्याचे मन भूतकाळात जाते आपण बी एड झाल्यावर मायला म्हणालो होतो तुला प्रत्येक पगारावर नवं लुगड आणलं जाईल (बारोमास पृ.५) या विचारांनी तो भावनाविवश होतो.

बेकारी, दारिद्र्य हे घटक माणसाला घरात नवा जीव जन्मास घालण्यास सुद्धा अडथळा ठरतात, एकनाथची पत्नी अशा दारिद्र्यात मुल जन्माला घालण्यास विरोध करते आणि संतती नियमनाचे साधन बसवून घेते. कधी म्हणून काही नसते घरात, घरभरून किराणा नाही, मनभरून कपडे नाहीत, गॅस नाही की एकसाधा स्टोह नाही सदा न कदा काळा धूर घरात, कुठफुटभराची फरशी नाही, सगळी पांढरी माती, ढोरासारखं जगावं लागतं बाई या घरात. ( बारोमास पृ१२)दारिद्र्य असणाऱ्या आणि बेकारीचे जीवन जगणाऱ्या नवऱ्याशी संसार करणाऱ्या स्त्रीची शोकांतिका सदानंद देशमुख यांनी या प्रसंगातून चित्रित केली आहे. साबणासारख्या क्षुल्लक कारणावरून होणारे भांडण आणि या सर्व परिस्थितीला कंटाळून एकनाथच्या बायकोने कायमचे माहेरी निघून जाणे आणि नवरा भेटायला आल्यावर ओळख न देणे, या सर्व प्रकारानंतर उद्वस्थ झालेले सुबनराव घराचा गावाचा निरोप घेवून दुसऱ्या गावी जातात आणि एकंदरीत सर्वच कुटुंबाची वाताहात होते आणि हे होण्यामागे असणारे एकमेव कारण म्हणजे 'बेकारी' आणि त्याला कारणीभूत असणारी व्यवस्था. कारण हे अपयश केवळ एकट्या एकनाथचे नसून या देशातील व्यवस्थेचे आहे. दुसऱ्याच्या लग्नाच्या पंक्तीत वाटप केल्याप्रमाणे गल्लीबोळात शिक्षण संस्थाचे वाटप करण्यात आले पण त्यातून डिग्री घेवून बाहेर पडणाऱ्या तरुणांचे भवितव्य काय? याचा विचार मात्र व्यवस्थेने केला नाही.

ही अवस्था केवळ बारोमास मधील एकनाथची नसून आपल्या आजूबाजूला असे असंख्य एकनाथ उद्ध्वस्त झालेले दिसतात. त्यामुळे सदानंद देशमुख यांची 'बारोमास'ही कादंबरी म्हणजे आजच्या शिक्षण व्यवस्थेतील आणि तरुणांच्या जीवनातील ज्वलंत वास्तव आहे.

**शिक्षण क्षेत्रातील अस्वस्थ करणारी बेकारी– अस्वस्थ नायक**

'अस्वस्थ नायक' ही उत्तम कांबळे यांची १८४ पृष्ठांची कादंबरी तिच्या नावाप्रमाणेच संवेदनशील आणि सुजाण वाचकांना नक्कीच अस्वस्थ करून सोडते. उत्तम कांबळे सुरवातीला म्हणतात की, आपण जागतिकीकरणात पोहचलो याचा अर्थ जगण्याच्या एका स्पर्धेत पोहचलो आहोत. या नव्या



Scanned with CamScanner

अज्ञानाचे अगदीच छोटे आणि मरणाचे मोठेप्रदेश तयार होत आहेत. जिंकणारे मूठभर आणि हरणारे खंडीभर अशी परिस्थिती आहे. एक प्रचंड मोठी आर्थिक विषमता घेवून जग पुढे सरकत आहे. विज्ञानाचा, तंत्रज्ञानाचा वापर करून मूठभर लोकांनी संपत्तीचा डोंगर उभा केला. त्याचवेळी दारिद्र्याचा अंधार पांघरणारे आणि उशाखाली भूक घेवून झोपणारे ही वाढत आहेत. भाकरीसाठी पुन्हा एकदा प्रचंड संघर्ष सुरु आहे. जग जवळ येण्याच्या काळात माणसं माणसांपासून दूर जात आहेत. जागतिकीकरणात सर्वांचाच विकास होईल, हे भाकीत खोटे ठरले आहे. त्याच त्या माणसांची संपत्ती वाढत आहे आणि दारिद्र्यरेषा रोज बाळंत होऊन वरवर सरकते आहे. ज्यांना जगण्याची प्रचंड चिंता ते प्रचंड अस्वस्थ आहेत. अस्वस्थ होत चाललेल्य जगातील अस्वस्थ नायकाची ही कथा आहे.

प्रस्तुत कथेचा नायक प्रशांत देसाई असून त्याचा मेरीटनुसार डी.एड नंबर लागत नाही म्हणून त्याच्या वडिलांनी दोन एकर जमीन विकून डी.एड. प्रवेशासाठी देणगी दिली. भविष्यात शिक्षक होण्याच्या ध्येयाने झपाटलेला प्रशांत प्रथम वर्गात डी. एड. उत्तीर्ण होतो आणि तिथून खऱ्या अर्थाने त्याच्या संघर्षमय जीवनाला सुरुवात होते. शिक्षक होण्याचे दूर पण पोटाची भूक भागवण्यासाठी त्याला करावा लागणारा संघर्ष पाहून असे वाटते की हीच का आपली महासत्तेकडे असणारी वाटचाल? प्रशांत जेंव्हा शाळेत नोकरी मागायला जातो तेंव्हा शाळेचे हेडमास्तर म्हणतात नोकरीसाठी प्रयत्न ही कल्पना आता मागे पडली आहे. मी स्वत: पन्नास हजार रुपये दिले, कायम होताना तेवढेच दिले, आणि आता बदली होऊ नये म्हणून तेवढेच द्यावे लागणार आहेत. प्रयत्नांची भाषा काय बोलता राव, पैशाची भाषा बोला पैशाची ....(अस्वस्थ नायक पृ. १२)यावरूनअसा प्रश्न पडतो की, आपली वाटचाल महासत्तेकडे होतीकी मोठ्या लोकांनी लहान लोकांवर सत्ता गाजवण्याकडे होती? शिक्षक होण्याचे स्वप्न पाहणारा प्रशांत हा खूप आशादायी आहे, मुलांना खूप काही शिकवण्याची स्वप्ने तो पाहतो. आणि हे करत असताना दोन वेळच्या जेवणासाठी कापड दुकान, दवाखाना, मटक्याचे ठिकाण, धर्माच्या नावाखाली तीर्थ विकणे, अशा ठिकाणी काम करतो, असे असले तरी तो तत्वनिष्ठ आणि संवेदनशील आहे. मटक्याच्या अड्ड्यावर मटका लावण्यासाठी नवऱ्याने पैसे चोरले म्हणून उर बडवून घेणारी त्याची बायको पाहून यापुढे अशा ठिकाणी काम करायचे नाही असे ठरवतो. कारण तत्वांशी तडजोड करण्यास तो असमर्थ आहे. आणि त्याला कारण म्हणजे त्याने घेतलेले शिक्षण आणि त्यावरील निष्ठा...

प्रशांतला एक दिवस भूक सहन होत नाही आणिएका लग्न समारंभातील जिलेबीच्या वासामुळे मोह आवरत नाही त्यामुळे तेथे जेवायला जातो परंतू घास तोंडात टाकणार एवढ्यात भिकारी म्हणून त्याला तेथून हाकलून दिले जाते. हा प्रसंग वरवर साधा असला तरी वास्तव परिस्थितीत बेकारीने किती उग्र स्वरूप धारण केले आहे हे दिसून येते. उत्तम कांबळे प्रशांतच्या रूपाने बेकारीचे वर्णन पुढीलप्रमाणे करतात, बेकारी म्हणजे मोठी विचित्र गोष्ट आहे, ती माणसचे रक्त पिते अष्टकुंडीसारखी.... आणि मेंदूहीखाऊन टाकते. (अस्वस्थ नायक पृ.८८) आजच्या परिस्थितीत तरुणांची अवस्था ही 'आई जेवू घालीना आणि बाप भिक मागू देईना' अशी झाली आहे त्यामुळे खोटी प्रतिष्ठाबाळगून समाजात मिरवावे लागते.

अस्वस्थ नायक मधील बेकारीचे चित्रण करणारे दुसरे पात्र म्हणजे एम.ए झालेला अशोक, अशोक नोकरी मिळत नाही म्हणून रस्त्यावर पेन विकतो आणि प्रशांतला सांगतो की आपल्याला नोकरी मिळण्यापाठीमागे तू म्हणतो त्या प्रमाणे राखीव जागा ही समस्या नाही, शिवाय राखीव

प्रवर्गातील तरुणांना तरी कुठे नोकऱ्या आहेत? त्यामुळे आपल्याला नोकरी न मिळण्यापाठीमागे व्यवस्था हे प्रमुख कारण आहे आणि ती व्यवस्था मोडून काढणे आवश्यक आहे असे तो प्रशांतला पुन्हा पुन्हा सांगतो, आणि भ्रष्ट असणाऱ्या व्यवस्थेला नक्षलवादी बनून बदलण्याचा प्रयत्न करतो.एक दिवस एका संस्थापकाला जीवे मारण्याची धमकी देवून प्रशांतला नोकरीवर घेण्यास भाग पाडतो. परंतु जेव्हा या नोकरी मिळण्यामागील सत्य समजते तेंव्हा तत्त्वनिष्ठ असणारा प्रशांत संस्थापकासमोर नेमणूकपत्र फाडून टाकतो.

सुशिक्षित बेकारांचे जीवन जगात असताना अनेकांनी जगण्यासाठी चालवलेल्या लढाईची व त्यांच्या मनातील अस्वस्थता यांची ही कहाणी आहे. अस्वस्थता हा माणसाचा स्थायीभाव आहे पण वर्षानुवर्षे माणसाचे जगण्याचे प्रश्न अधिक तीव्र होत आहेत आणि आदर्शवादाला कवटाळून तर ही वाटचाल अधिकच कठीणहोत आहे. तरी देखील प्रस्तुत कथेचा नायक प्रशांत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी कितीही अस्वस्थता आली तरी धडपडताना दिसतो. असेअसले तरी तो बेकारीचा चक्रव्यूह तोडण्यात यशस्वी होत नाही हीच मोठी शोकांतिका आहे.

**समारोप:**

'बारोमास' आणि 'अस्वथ नायक' मधील अनुक्रमे एकनाथ आणि प्रशांत दोघेही शिक्षक होण्यासाठी पात्र आहेत त्यामुळे ते उज्वल भविष्याचे स्वप्न पाहतात; परंतु प्रत्यक्षात वास्तव परिस्थिती पाहून दोघेही हतबल होतात. हा विषय आता कादंबरीपुरता मर्यादित राहिला नाही.आजच्या बेकारीने यापुढील टप्पा गाठला आहे, केवळ ही अवस्था बी.एड, डी.एड पुरती मर्यादित राहिली नाही, सेट, नेट पीएच.डी. धारकांची अवस्था देखील प्रस्तुत कादंबऱ्यातील नायकांपेक्षा भयानक आहे. आज हे उच्च शिक्षित तरुण कादंबरीत नाही तर प्रत्यक्षात जुगार अड्डा, हातभट्टी, वडापावची गाडी, हमाली, वेटर, बिगारी, इ. प्रकारची कामे करताना दिसतात. आपल्या आजूबाजूला असंख्य एकनाथ आणि प्रशांत वावरताना दिसतात. परंतू विचारशून्य आणि डोळ्यांवर पट्टी बांधून आंधळ्याचे सोंग घेतेलेली व्यवस्था अजून नेमकी कशाची वाट पाहतआहे हे न समजण्यापलीकडे आहे. त्यामुळेभविष्यात जर उत्तम कांबळे यांच्या कादंबरीतील अशोक प्रमाणे वास्तवात असे उच्च शिक्षित नक्षलवादी निर्माण झाले तर आश्चर्य वाटणार नाही.

**संदर्भ :**


१) गायकवाड शरद आणि शिंदे सुनील (सं) 'जागतिकीकरण आणि मराठी साहित्य' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००९

२) देशमुख सदानंद, 'बारोमास' कॅन्टीनेटल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २००२,

३) कांबळे उत्तम, 'अस्वस्थ नायक' मनोविकास प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती, २०००





ISSN No. 2319-6025



Scanned with CamScanner